दैनिक
# जिल्हा टाईम्स

नंबर १
ऑनलाईन मराठी दैनिक
आपली बातमी, आपला पेपर
जिल्हा टाईम्स

संपादक : प्रमोद विठ्ठल दळवी

Digital Copy

RNI NO : MAHMAR/2015/64432

jilhatimesnews@gmail.com 9819249692
dalvipress@gmail.com 0251-2523502

वर्ष : ७ ◆ अंक : २२० सोमवार, दि. २७ डिसेंबर २०२१ पाने ४ ◆ मूल्य : रु. २



## गोरगरीब व गरजू विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा आणि शालेय वस्तूंचे वाटप



**जिल्हा टाईम्स चेंबूर, दि. २६-** 'एक क्षण आनंदाचा' या उक्तीप्रमाणे नाताळ सणाचे औचित्य साधून अक्षरा सामाजिक प्रतिष्ठान या सामाजिक संस्थेने पुन्हा एकदा आपली सामाजिक बांधिलकी जोपासून गेली दोन वर्षे कोरोना प्रादुर्भावाखाली आपला आनंद गमावून बसणाऱ्या गरीब आणि गरजू विद्यार्थ्यांना आपला आनंद द्विगुणित करण्यासाठी तसेच आपले आनंदाचे काही क्षण अनुभवता यावेत ह्या उद्देशाने अक्षरा अपना स्कूल पांजरपोळ, चेंबूर मुंबई येथील भागांत चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

यांत सहभाग घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला आनंद वाटणाऱ्या सांताक्लॉजचे प्रतीक असलेल्या दिवसानिमित्त प्रत्येक विद्यार्थ्याला शालेय वस्तू भेटवस्तू म्हणुन प्रदान करण्यात आली. याप्रसंगी अक्षरा सामाजिक प्रतिष्ठानचे अध्यक्ष अमोल बंजारे, दिग्दर्शक पत्रकार महेश्वर तेटांबे, समाज सेविका सौ विद्या विजय पाटील, समाजसेवक विजय पाटील, बालकलाकार मास्टर आर्य तेटांबे तसेच स्थानिक रहिवासी उपस्थित होते. या उपक्रमास मदत करणाऱ्या सर्व मान्यवरांचे संस्थेचे अध्यक्ष अमोल बंजारे यांनी आभार मानले.